फौजदारी चौकशी अर्ज क्र.५०/२०२१.
रामकली गुप्ता वि. कोमल गुप्ता वगैरे.
अंतरिम पोटगी अर्ज.
CNR NO.MHRG160002282021

# निशाणी क्र.०५ वरील आदेश

(दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी पारीत)

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ नुसार अंतरीम अथवा एकतर्फा आदेश मिळणेकामी दाखल केला आहे.

०२. सदरहु अर्जाकामी सामनेवाला यांना दि.०१.१२.२०२१ रोजी नोटीसची बजावणी होवून सुध्दा सामनेवाला यांनी अर्जाकामी लेखी म्हणणे सादर केलेले नाही.

०३. अर्जदारतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, त्यांचा युक्तीवाद अर्जाप्रमाणे असुन पुढे युक्तीवाद केला की, अर्जदार यांना तीन अपत्ये असून तिघेही विवाहित आहेत. त्यांचा मोठा मुलगा संतोष हा पुणे येथे त्याच्या कुटुंबासोबत राहतो. दुसरा मुलगा शैलेश व तीसरा मुलगा सागर सामनेवाला क्र.०२ हे परळी येथेच राहतात. अर्जदार व तिचे पती हे ज्येष्ठ नागरीक असुन अर्जदार हिचे पतीचे हृदयाची शस्त्रक्रिया झाली असुन ते नेहमी सतत आजारी असतात. मौजे परळी येथे अर्जदाराचे स्वतःच्या मालकीचे घर व दुकान आहे. मुलांच्या लग्नानंतर अर्जदार यांनी मुलांना घरे दिले. अर्जदार यांचा मुलगा सागर याचे दि.३०.११.२०१४ रोजी 'अखिल भारतीय भुजीया समाज कल्याण संघटना, धुळे' यांच्या आयोजीत सामुहिक विवाह सोहळ्यात हिंदु रुढी परंपरेनुसार कोमल संजय गुप्ता हिच्यासोबत विवाह झाला होता. लग्नानंतर मुलगा सागर व सुन कोमल यांच्यात वेगळे राहण्याच्या कारणावररुन वाद होवू लागले म्हणून अर्जदार

यांनी त्यांना वेगळे राहण्याची संमती दिली. त्यानुसार अर्जदार यांचा मुलगा सागर व सुन कोमल यांनी दि.१०.०२.२०१६ रोजी संजय गुप्ता, शालीराम गुप्ता व इतर समाजातील लोक यांच्या समक्ष व्यवस्थित एकत्र नांदण्याकामी रुपये शंभरच्या बॉण्ड पेपरवर लिहुन दिल्यावर ते वेगळे राहत होते.

०४. अर्जदार यांचे परळी येथे तीन मजली घर असुन खालच्या मजल्यावर मुलगा शैलेश त्याचे कुटुंबासह, दुसऱ्या मजल्यावर अर्जदार स्वतः तिचे पतीसह आणि तीसऱ्या मजल्यावर मुलगा सागर त्याच्या पत्नीसह राहतो. त्यानंतर सुन कोमल हिने सर्वांशी भांडण करुन, वाद घालुन जांभूळपाडा पोलीस दूरक्षेत्रामध्ये खोट्या तक्रारी केल्या व कोर्टात केस दाखल करण्याची धमकी सर्वांना दिली. अर्जदार यांची सुन कोमल हिने मंगळुरपीर येथील न्यायालयात तक्रार दाखल केली होती, सदरील प्रकरण खारीज करण्यात आले. अर्जदार यांचा मुलगा शैलेश हा सुन कोमल हिच्या भांडण व शिव्यांना कंटाळून सन २०१७ साली जुन्या घरामध्ये राहण्यास गेला. मुलगा शैलेश हा त्याचे आई–वडिलांची देखभाल करुन त्यांना राशन भरुन देवून औषधांचा खर्च, येण्या–जाण्याचा खर्च तसेच लाईट बिल भरुन देत होता. अर्जदार यांचा मुलगा शैलेश दुसरीकडे राहण्यास गेल्यानंतर सामनेवाला हे दोघेही पहिल्या मजल्यावर राहण्यास आले. अर्जदार व तिचे पतीच्या औषधांचा खर्चाकरीता त्यांनी तीसऱ्या मजल्यावरील रुम भाड्याने दिल्यावर सुन कोमल हिने त्यांच्याशी भांडण करुन रुम खाली करण्यास भाग पाडले.

०५. सामनेवाला क्र.०१ व ०२ हे अर्जदार यांच्या मालकीचे घरात राहुन त्यांना घरातुन बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत असुन गैरअर्जदार क्र.०१ ही अर्जदार यांच्या रुमच्या लाईटचे मुख्य बटण बंद करणे, पाण्याचे मशिन बंद करणे असा प्रकारे नाहक त्रास देत आहे. अर्जदार हिचे पती वयस्कर असुन अजारापणामुळे त्यांना सारखे पायऱ्या चढणे उतरणे होत नाही. अर्जदार यांना सामनेवाला हे मारण्यास धावून येवून जीवे ठार माण्याची धमकी देतात. अर्जदार व

तिच्या पतीने पालक म्हणून त्यांची जबाबदारी पार पाडत आहेत परंतु सामनेवाला क्र.०१ व ०२ हे अर्जदार यांना आधार देण्याऐवजी त्रास देवून त्यांना म्हातारपणी सुखाने जगू देत नाहीत. सबब, अर्जदार यांनी त्यांच्या मुलाने व त्याच्या कुटुंबाने राहण्याची व्यवस्था दुसरीकडे करुन रुम खाली करुन दिल्यास अर्जदार व तिच्या पतीला दैनंदिन गरजा व औषधपाण्याच्या खर्चासाठी रक्कम उपलब्ध होईल तसेच सानेवाला क्र.०१ व ०२ यांच्याकडून होणाऱ्या मानसिक व शारीरिक त्रासापासुन संरक्षणात्मक तसेच अर्जदार यांना खाण्याचा व औषधाच्या खर्चापोटी रक्कम रुपये १५,०००/– मिळावे अशी मागणी करुन त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०६. सामनेवाला यांना अर्जाच्या नोटीसची बजावणी संरक्षण अधिकारी, यांच्या दि.२६.११.२०२१ रोजीच्या अहवालावरुन दिसुन येत आहे. त्यानंतर सामनेवाला क्र.०२ याने प्रकरणात हजर होवून सुध्दा विहित मुदतीत म्हणणे दाखल केलेले नाही.

०७. अर्जदार व सामनेवाला यांच्यातर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांची पाहणी केली.

०८. अर्जदाराने सामनेवालांविरुध्द केलेले आरोप प्रथमदर्शनी व या टप्प्यावर तरी योग्य दिसून येत आहेत. दोन्ही पक्षांच्या पुराव्यानंतरच ते कारण खरे आहे किंवा नाही हे ठरवले जावू शकते. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या तीन मुलभूत गरजा आहेत हे त्रीकालबाधीत सत्य आहे. मुळ अर्ज पुरावा घेवून गुणदोषांवर चालून न्यायनिर्णय होण्यास कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदार ही स्वतःचे व तिचे पतीचे पालन–पोषण करण्यास सक्षम आहे तसेच तिला उत्पन्नाचे साधन आहे ही बाब दर्शविण्याकरीता सामनेवाला यांनी प्रकरणात हजर होवून कोणताही लेखी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. अर्जदार व तिच्या पतीची पालन–पोषणाची संपूर्ण जबाबदारी सामनेवाला क्र.०२ ची आहे. अर्जदार या सामनेवाला पासुन वेगळ्या राहत आहेत परंतु सामनेवाला

क्र.०१ व ०२ हे त्यांना नाहक कारण नसताना मानसिक त्रास देत आहेत. तसेच सामनेवाला क्र.०२ हा अर्जदार यांचा मुलगा असुन त्याला त्याचे वयोवृध्द आई–वडिलांच्या पालन–पोषणाची सोय करणे ही कायदेशीर कर्तव्य अथवा जबाबदारी आहे. सदर जबाबदारी सामनेवाला यास कोणत्याही कायदेशीर कारणास्त झटकता येणार नाही.

०९. सामनेवाला यांनी प्रकरणात दाखल होवून त्यांचे म्हणणे देवून त्याच्या उत्पन्नाबाबत अथवा अर्जदार यांच्या अर्जातील कथने खोडून काढण्यासाठी हजर होवुनही त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. अर्जदार यांचा सांभाळ करण्याची कायदेशीर जबाबदारी सामनेवाला याची आहे. सामनेवाला यास सदर कायदेशीर जबाबदारी टाळता येणार नाही. सामनेवाला शरीराने असमर्थ आहे असा पुरावा नाही. अर्जदार यांनी सदर अर्जामध्ये केलेल्या आरोपामध्ये प्रथमदर्शनी सत्यता दिसून येत आहे.

१०. सर्वसाधारणपणे अर्जदार यांचे पालन–पोषणाकरीता तसेच औषधोपचारा करीता किमान दररोज २००/– ते ३००/– रुपये एवढा खर्च येईल असा अंदाज आकाशाला भिडणाऱ्या महागाईवरुन व वर्तमान दैनंदिन परिस्थितीवरुन काढता येईल म्हणून अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ५,०००/– अंतरिम पोटगी सामनेवाला क्र.०२ कडुन मिळण्यास पात्र आहे असे मला वाटते, म्हणुन खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज अशतः मंजूर करण्यात येतो.

०२. सामनेवाला यांनी अर्जदार हिस कोणत्याही प्रकारे शारीरिक, मानसिक त्रास होईल असे वर्तन करु नये अशी ताकिद देण्यात येते.

०३. सामनेवाला क्र.०२ यांनी अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) अंतरिम पोटगी द्यावी.

०४. सामनेवाला यांनी कौंटुबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १९(ब) नुसार त्यांची राहण्याची इतर ठिकाणी सोय/व्यवस्था स्वतः करावी.

०५. दोन्ही पक्षकारांना आदेशाची प्रत तात्काळ विनाशुल्क द्यावी.

स्वाक्षरी/-

**ठिकाणः पाली.** **(मीना वा. जाधव)**

**दिनांकः २५/०८/२०२२** **न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, पाली.**